अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत परभणी जिल्ह्यांतर्गत खालीलप्रमाणे कामांना शासनामार्फत मंजूरी प्राप्त झाली असून सदर कामांबाबत संबधित अंमलबजावणी यंत्रणेमार्फत मंजूर प्राप्त कामांचे अंदाजपत्रक बांधकाम विभागाकडून प्राप्त करुन रितसर प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर सदर कामासंदर्भात प्राप्त होणारा निधी संबंधित यंत्रणेला वर्ग करण्यात येईल व सदर कामाचे प्रशासकीय मान्यता आदेश देण्यात येतील.

## बहुल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०१६ - १७ अंतर्गत मंजुर कामे

| | कामाचे नांव | मंजूर निधी (लक्ष) |
|---|---|---|
| **नगर पंचायत पालम** | नवनिर्मित नगरपंचायत पालम शहरातील अल्पसंख्याक वस्तीमध्ये सी.सी.रोड व नाली बांधकामासाठी लागणारा आवश्यक निधी | रु.१०.००/- |
| | अल्पसंख्याक वस्तु सुधार योजनेंतर्गत शहरात पाणीपुरवठा व्यवस्था ऊभारणीकरिता आवश्यक निधी. | रु.१०.००/- |
| | **एकूण** | **रु.२०.००/-** |

## बहुल नागरी क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०१७-१८ अंतर्गत मंजुर कामे

| | कामाचे नांव | मंजूर निधी (लक्ष) |
|---|---|---|
| **म.न.पा. परभणी** | परभणी महानगरपालिका अंतर्गत जिंतूर रस्त्यावरील ख्रिश्चन समाजाच्या स्मशानभूमीस संरक्षण भिंतीचे बांधकाम करणेबाबत . | **रु.२०.००/-** |

## बहुल ग्रामीण क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०१७-१८ अंतर्गत मंजुर कामे

| अ क्र | तालूका | ग्रामपंचायत चे नाव | विकास काम | मंजूर निधी (रु. लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | परभणी | पेगरगव्हाण | अल्पसंख्याक वस्तीत सी.सी. सिमेंट रस्ता करणे | रु.१०.००/- |
| २ | | तरोडा | अल्पसंख्याक वस्तीत सी.सी. सिमेंट रस्ता करणे | रु.१०.००/- |
| ३ | गंगाखेड | राणीसावर गाव | नवी आबादी कॉलनी मध्ये सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे. | रु.५.००/- |
| | | | **एकूण** | **रु.२५.००/-** |

## सदभाव मंडप बांधकाम

परभणी जिल्ह्याचे मुख्यालयाचे ठिकाणी एक सदभाव मंडपाचे बांधकाम करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. सदर प्रस्तावांमध्ये एकसुत्रता आणण्याच्या अनुषंगाने मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांचेकडून बनवून घेण्यात आलेल्या आराखड्यानुसार व त्यानुसार शासनमार्फत प्राप्त झालेल्या निर्देशानुसार परभणी शहरांतर्गत एक सद्भाव मंडप बांधकाम करणेकरिता आवश्यक असलेली जागा निश्चित करुन सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करुन देण्याबाबत परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांचेमार्फत त्वरीत आवश्यक कार्यवाही करुन घेऊन परभणी शहरामध्ये एक सदभाव मंडपाचे बांधकाम करणेबाबतचा प्रस्ताव बांधकाम विभागामार्फत तयार करुन घेवुन लवकरच शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.